| | | |
|---|---|---|
| पुणे पोलीस | वाहतुक शाखा, पुणे शहर<br>पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,<br>बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे | पुणे शहर वाहतूक पोलीस PUNE CITY TRAFFIC POLICE |

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./8341/२०२३ दिनांक :- 21 /११/२०२३

**प्रेसनोट**

खडकी वाहतूक विभागाअंतर्गत महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि. (पुणे मेट्रो) यांचेमार्फत पुणे मेट्रोचे काम सुरु असून सदर कामाअंतर्गत बोपोडी मेट्रो स्टेशनचे काम करण्यात येत असून सदरचे काम सुरु असताना एखादा अपघात अगर वाहतूक कोंडी होवु नये याकरीता या परिसरातील वाहतूकीत बदल करणे आवश्यक आहे. याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही. ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर खडकी वाहतूक विभागातील वाहतूकीत **दि. २३/११/२०२३ ते १५/१२/२०२३ रोजीदरम्यान रात्री २३.०० ते ०६.०० वा. पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात** खालीलप्रमाणे **बदल करीत आहे.**

## खडकी वाहतूक विभागा अंतर्गत

दि. २३/११/२०२३ ते १५/१२/२०२३ रोजी दरम्यान रात्री २३.०० ते ०६.०० वा. पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात

- **जुना पुणे मुंबई महामार्गावरुन पिंपरी चिंचवडकडून पुणेचे दिशेने येणारी सर्व प्रकारची वाहने बोपोडी चौकातून डावीकडे वळण घेवून खडकी बाजार, एम.एस.ई.बी. चौक, उजवीकडे वळण घेवून चर्च चौकातून इच्छितस्थळी जातील.**

- **दरम्यानच्या कालावधीत पुणे कडुन पिंपरी चिंचवडच्या दिशेने जाणारी वाहतूक चर्च चौकातुन जुना पुणे मुंबई महामार्गावरुन नियमितपणे सुरु राहिल.**

( विजयकुमार मगर )
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

**प्रत :- सर्व संबंधितांना**